वृत्तपत्राचे नांव :— लोकसत्ता
वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :— मुंबई
वृत्तपत्र पान क्र :— 7
दिनांक :—19 / 09 / 2010

# १४ विद्या ६४ कला

१४ विद्या आणि ६४ कला याबद्दल अनेकांच्या मनात उत्सुकता असते. त्याबद्दल आमच्याकडे सतत विचारणाही होत असते. त्या १४ विद्या आणि ६४ कलांची ही ओळख.

## १४ विद्या

चार वेद + सहा वेदांगे + **न्याय, मीमांसा, पुराणे व धर्मशास्त्र=१४**

१) ऋग्वेद २) यजुर्वेद ३) सामवेद ४) अथर्ववेद

१) व्याकरण- भाषेतील शब्दांच्या व्यवहाराचे शास्त्र.
२) ज्योतिष- ग्रहगती तथा सामुद्रिक जाणण्याची विद्या.
३) निरुक्त- वेदांतील कठीण शब्दांचे अर्थ सांगणारे शास्त्र.
४) कल्प- धार्मिक विधी- व्रतांचे वर्णन करणारे शास्त्र.
५) छंद- शब्दांची गानयोग्य रचना व काव्यवृत्ताचे ज्ञान.
६) शिक्षा- शिक्षण, अध्यापन व अध्ययन.

१) न्याय मीमांसा पुराणे धर्मशास्त्र.

## ६४ कला

१) पानक रस तथा रागासव योजना- मदिरा व पेय तयार करणे.
२) धातुवद- कच्ची धातू पक्की व मिश्रधातू वेगळी करणे.
३) दुर्वाच योग- कठीण शब्दांचा अर्थ लावणे.
४) आकर ज्ञान- खाणींविषयी अंतर्गत सखोल ज्ञान असणे.
५) वृक्षायुर्वेद योग- उपवन, कुंज, वाटिका, उद्यान बनविणे.
६) पट्टिका वेत्रवाणकल्प- नवार, सुंभ, वेत इत्यादींनी खाट विणणे.
७) वैनायिकी विद्याज्ञान- शिष्टाचार व विनय यांचे ज्ञान असणे.
८) व्यायामिकी विद्याज्ञान- व्यायामाचे शास्त्रोक्त ज्ञान असणे.
९) वैजापिकी विद्याज्ञान- दुसऱ्यावर विजय मिळविणे.
१०) शुकसारिका प्रलापन- पक्ष्यांची बोली जाणणे.
११) अभिधान कोष छंदोज्ञान- शब्द व छंद यांचे ज्ञान असणे.
१२) वास्तुविद्या- महाल, भवन, राजवाडे, सदन बांधणे.
१३) बालक्रीडाकर्म- लहान मुलांचे मनोरंजन करणे.
१४) चित्रशब्दापूपभक्षविपाक क्रिया- पाकक्रिया, स्वयंपाक करणे.
१५) पुस्तकवाचन- काव्यगद्यादी पुस्तके व ग्रंथ वाचणे.
१६) आकर्षण क्रीडा- दुसऱ्याला आकर्षित करणे.
१७) कौचुमार योग- कुरुप व्यक्तीला लावण्यसंपन्न बनविणे.
१८) हस्तलाघव- हस्तकौशल्य तथा हातांनी कलेची कामे करणे.
१९) प्रहेलिका- कोटी, उखाणे वा काव्यातून प्रश्न विचारणे.
२०) प्रतिमाला- अंत्याक्षराची योग्यता ठेवणे.
२१) काव्यसमस्यापूर्ती- अर्धे काव्य पूर्ण करणे.
२२) भाषाज्ञान- देशी-विदेशी बोलींचे ज्ञान असणे.
२३) चित्रयोग- चित्रे काढून रंगविणे.
२४) कायाकल्प- वृद्ध व्यक्तीला तरुण करणे.
२५) माल्यग्रंथ विकल्प- वस्त्रप्रावरणांची योग्य निवड करणे.
२६) गंधयुक्ती- सुवासिक गंध वा लेप यांची निर्मिती करणे.
२७) यंत्रमातृका- विविध यंत्रांची निर्मिती करणे.
२८) अत्तर विकल्प- फुलांपासून अर्क वा अत्तर बनविणे.
२९) संपाठ्य- दुसऱ्याचे बोलणे ऐकून जसेच्या तसे म्हणणे.
३०) धारण मातृका- स्मरणशक्ती वृद्धिंगत करणे.
३१) छलीक योग- चलाखी करून हातोहात फसविणे.
३२) वस्त्रगोपन- फाटकी वस्त्रे शिवणे.
३३) मणिभूमिका- भूमीवर मण्यांची रचना करणे.
३४) द्यूतक्रीडा- जुगार खेळणे.
३५) पुष्पशकटिका निमित्त ज्ञान- प्राकृतिक लक्षणाद्वारे भविष्य सांगणे.
३६) माल्यग्रथन- वेण्या, पुष्पमाला, हार, गजरे बनविणे.
३७) मणिरागज्ञान- रंगावरून रत्नांची पारख करणे वा ओळखणे.
३८) मेषकुक्कुटलावक- युद्धविधी- बोकड, कोंबडा इ.च्या झुंजी लावणे.
३९) विशेषकच्छेद ज्ञान- कपाळावर लावायच्या तिलकांचे साचे करणे.
४०) क्रिया विकल्प- वस्तूच्या क्रियेचा प्रभाव उलटविणे.
४१) मानसी काव्यक्रिया- शीघ्र कवित्व करणे.
४२) आभूषण भोजन- सोन्या-चांदी वा रत्नामोत्यांनी काया सजवणे.
४३) केशशेखर पीड ज्ञान- मुकुट बनविणे व केसात फुले माळणे.
४४) नृत्यज्ञान- नाचाविषयीचे शास्त्रोक्त सखोल ज्ञान असणे.
४५) गीतज्ञान- गायनाचे शास्त्रीय सखोल ज्ञान असणे.
४६) तंडुल कुसुमावली विकार- तांदूळ व फुलांची रांगोळी काढणे.
४७) केशमार्जन कौशल्य- मस्तकाला तेलाने मालीश करणे.
४८) उत्सादन क्रिया- अंगाला तेलाने मर्दन करणे.
४९) कर्णपत्र भंग- पानाफुलांपासून कर्णफुले बनविणे.
५०) नेपथ्य योग- ऋतुकालानुसार वस्त्रालंकाराची निवड करणे.
५१) उदकघात- जलविहार करणे. रंगीत पाण्याच्या पिचकारी करणे.
५२) उदकवाद्य- जलतरंग वाजविणे.
५३) शयनरचना- मंचक, शय्या व मंदिर सजविणे.
५४) चित्रकला- नक्षी वेलवुट्टी व चित्रे काढणे.
५५) पुष्पास्तरण- फुलांची कलात्मक शय्या करणे.
५६) नाट्यअख्यायिका दर्शन- नाटकांत अभिनय करणे.
५७) दशनवसनांगरात- दात, वस्त्रे, काया रंगविणे वा सजविणे.
५८) तुर्ककर्म- चरखा व टकळीने सूत काढणे.
५९) इंद्रजाल- गारुडविद्या व जादूटोणा यांचे ज्ञान असणे.
६०) तक्षणकर्म- लाकडावर कोरीव काम करणे.
६१) अक्षर मुष्टिका कथन- करपल्लवीद्वारे संभाषण करणे.
६२) सूत्र तथा सूचीकर्म- वस्त्राला रफू करणे.
६३) म्लेंछीतकला विकल्प- परकीय भाषा ठाऊक असणे.
६४) रत्नरौप्य परीक्षा- अमूल्य धातू व रत्ने यांची पारख करणे.

■ नंदिनी बोपर्डीकर